सुधीर मुनगंटीवार यांच्यासोबत झालेल्या धक्काबुक्कीचा सर्वत्र निषेध!

निवडणुकीचे वातावरण गढुळ करण्याचा प्रयत्न करणाऱ्या काँग्रेसला त्याची जागा दाखवा - महायुतीच्या नेत्यांचे बल्लारपूर क्षेत्रातील मतदारांना आवाहन

चंद्रपूर, दि. १९: निवडणूक प्रचार तोफा थंडावल्यानंतर कार्यकर्त्यांची वैयक्तिक भेट घेण्याकरिता मुल तालुक्यातील कोसंबी गावात गेलेल्या महायुती उमेदवार व जेष्ठ भाजप नेते श्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासोबत काँग्रेस उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांकडून झालेला धक्काबुक्कीचा प्रकार अत्यंत निंदनीय व निषेधार्थ आहे. अशा शब्दात महायुतीच्या नेत्यांनी कोसंबी येथील घडलेल्या प्रकाराचा निषेध नोंदविला आहे. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, शिवसेनेचे नेते बंडू हजारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष नितीन भटारकर, रिपाई (आठवले)चे अध्यक्ष गौतम तोडे इत्यादी महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी यासंदर्भात तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

महायुतीच्या नेत्यांनी या संदर्भात दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, गेली अनेक दशके महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत सुसंस्कृतपणे आणि संवेदनशीलपणे काम करणाऱ्या सुधीर मुनगंटीवार यांच्यासारख्या लोकनेत्याशी अरेरावी करून विधानसभा निवडणुकीचे वातावरण गढूळ करण्याचा जो प्रकार काँग्रेस उमेदवार संतोष रावत यांच्याकडून व त्यांच्या कार्यकर्त्यांकडून झाला हे अतिशय क्लेशदायक आहे. गेली अनेक वर्ष राजकारणात राहून केवळ सामाजिक हिताचा विचार करणारे, मतदारसंघातील प्रत्येक गावात मूलभूत आणि पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी धडपडणारे, लहान मुलांच्या हृदयाची मोफत शस्त्रक्रिया करून अनेक कुटुंबांना आरोग्याच्या सेवा उपलब्ध करून देणारे, शिक्षण कृषी आणि उद्योग क्षेत्राची आपल्या मतदारसंघात भरभराट व्हावी यासाठी सातत्याने लढा देणारे अभ्यासू व कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी म्हणून सर्वत्र ख्यातीप्राप्त असल्याने सुधीर मुनगंटीवार लोकप्रिय असल्याने सातव्यांदा निवडून येत असल्याचे वातावरण असतानाच केवळ मतदारांना संभ्रमित करण्यासाठी, कार्यकर्त्यांना उत्तेजित करून तेढ निर्माण करण्याच्या दृष्टीने समाजातील वातावरण कलुशीत करण्याचा काँग्रेस उमेदवाराचा प्रयत्न मतदार नक्कीच हाणून पाडतील असा विश्वास आहे.

बल्लारपूर मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलून देणारे सुधीर मुनगंटीवार यांच्यासारखा संवेदनशील आणि अभ्यासू लोकनेता इतर प्रवृत्तींवर नेहमीच प्रभावी ठरत असल्याने सृजनशील मतदार आणि समस्त लाडक्या बहिणी निश्चितपणे त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या आहेत याबद्दल आमच्या मनात शंका नाही. ही निवडणूक बल्लारपूर मतदार संघाच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून मुल, पोंभुर्णा, बल्लारपूर आणि दुर्गापूर या क्षेत्रातील विकास कामांची गती अधिक गतीने आणि वेगाने करण्याची संधी आपल्याला प्राप्त करून देणारी आहे. या मतदार संघातील जनतेने कुठलाही संभ्रम मनात न बाळगता नकारात्मक प्रवृत्तींना रोखण्यासाठी सुधीर मुनगंटीवार यांच्यासारख्या लोकनेत्याला प्रचंड बहुमताने निवडून द्यावे हे कळकळीचे आवाहन.